**शासकीय रक्तपेढीमार्फत अफेरेसीस (Apheresis) पध्दतीने संकलित करण्यात येणाऱ्या प्लेटलेटचे प्रक्रिया शुल्क निश्चित करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रारसं २०२१/प्र क्र १८५/आरोग्य -५**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई.
दिनांक: २७ मे,२०२१.

**वाचा :-**

१) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या मार्गदर्शक सूचना, पत्र क्र. एस. १२०१६/०१/२०१२-नॅको (एनबीटीसी), दि. १२ फेब्रुवारी, २०१४.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. रारसे-२०१३/प्र.क्र.२२४/आ-५, दि. २५ जून, २०१४.
३) संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद पत्र क्र. रा.र.सं.प/प्लेटलेटचे प्रक्रिया शुल्क/२०२१/५८७, दिनांक १७ मार्च, २०२१.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील केंद्र शासनाच्या पत्रान्वये रक्त व रक्त घटकासाठी आकारावयाचे प्रक्रिया / चाचणी शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अफेरेसीस पध्दतीने संकलित करण्यात येणाऱ्या प्लेटलेटचे (Single donor platelets) अशासकीय रक्तपेढयांसाठी आवश्यक त्या सर्व चाचण्या पूर्ण करुन आकारण्यात येणाऱ्या सुधारीत प्रक्रिया शुल्काबाबतचे परिपत्रक संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. तथापि, सदर परिपत्रकामध्ये शासकीय अफेरेसीस मशिनची सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर अफेरेसीस पध्दतीने संकलित करण्यात येणाऱ्या प्लेटलेटचे प्रक्रिया शुल्क आकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील शासकीय रक्तपेढयांमध्ये अफेरेसीस मशीनची सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर अफेरेसीस पध्दतीने संकलित करण्यात येणाऱ्या प्लेटलेटचे प्रक्रिया शुल्क आकारण्यासंदर्भात राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्य निर्देशानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत स्थापन केलेल्या तज्ञांच्या अभ्यास गटाने शिफारस केल्यानुसार शासकीय रक्तपेढयांमार्फत अफेरेसीस पध्दतीने वितरीत करण्यात येणाऱ्या Single donor

platelet च्या प्रक्रिया शुल्काचा दर रु. ९०००/- (रु. नऊ हजार फक्त) करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये NAT व Chemiluminescence या अतिरिक्त चाचण्यांचा समावेश असणार नाही. सदर चाचण्यांसाठी राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने व महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेले दर लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्रमांक २२१०२१०५२५१७३७४०१७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव (२) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई.
५) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६) संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८) उप औषध नियंत्रक, वेस्ट झोन, मुंबई.
९) धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई.
१०) अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
११) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१२) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१३) धर्मादाय संस्था संचालित /खाजगी / रेड क्रॉस रक्तपेढया (सर्व)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५) निवडनस्ती (आरोग्य-५)